शनिवार दि.२१ सप्टेंबर२०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : १९
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in

### कोणताही 'माई का लाल'आरक्षण रद्द करू शकत नाही

# एकनाथ शिंदे यांचा पंतप्रधान मोदींपुढे दावा,काँग्रेसे नेते राहुल गांधींवर घणाघात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वर्धा (वृत्तसंस्था)**

कोणताही माई का लाल भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले आरक्षण रद्द करू शकत नाही, असा घणाघात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी काँग्रेस नेते राहुल गांधींवर निशाणा साधताना केला. काही जण परदेशात जावून देशाची बदनामी करत आहेत. ते आरक्षण रद्द करण्याची वलग्ना करत आहेत. पण हे आरक्षण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिले आहे. ते कुणालाही रद्द करता येणार नाही, असे ते म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत शुक्रवारी वर्धा येथे पीएम विश्वकर्मा योजनेचा वर्षपूर्ती सोहळा संपन्न झाला. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर निशाणा साधताना उपरोक्त टीका केली. राहुल गांधी यांनी आपल्या अमेरिका दौऱ्यात आरक्षण रद्द करण्यासंबंधीचे कथित वादग्रस्त विधान केले होते. मुख्यमंत्री शिंदे त्यासंबंधी बोलत होते.

काही जण परदेशात जावून देशाला बदनाम करण्याचा प्रयत्न करत आहेत. आरक्षण रद्द करण्याची भाषा करत आहेत. पण भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले आरक्षण कुणालाही रद्द करता येणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी सत्तेत आहेत, तोपर्यंत कोणताही माईका लाल आरक्षण रद्द करू शकत नाही, असे एकनाथ शिंदे यांनी यावेळी काँग्रेसला ठणकावून सांगितले.

एकनाथ शिंदे म्हणाले, काही जण जम्मू काश्मीरमनध्ये कलम ३७० पुन्हा लागू करण्याचा दावा करत आहेत. याद्वारे ते दहशतवाद्यांच्या सूरात सूर मिसळत आहेत. हे कलम रद्दबातल केल्यानंतर जम्मू काश्मीरचा मोठा विकास झाला. हा विकास त्यांना रोखायचा आहे का? मोदींनी सामान्य माणसाला ताकद देऊन त्यांचा सन्मान वाढवण्याचे काम सुरू केले आहे. त्यामुळेच



त्यांनी वन नेशन वन इलेक्शन ही योजना आणली आहे.मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले, २१ वे शतक भारताचे आहे. मोदी हे या देशाचे कर्णधार आहेत. त्यांनी देशातील महिलांना आत्मसन्मान मिळवून दिला. मागील १० वर्षांत जवळपास १० कोटी महिला स्वावलंबी बनल्या. आज अहिल्यादवेळी होळकर स्टार्टअप योजना सुरू झाली. त्यासाठी महिलांना २५ लाखांचे अर्थसहाय्य केले जात आहे. १ हजार महाविद्यालयांत आचार्य चाणक्य कौशल्य विभाग सुरू केला जात आहे. पीएम मित्र टेक्स्टाईल पार्कचीही सुरुवात होत आहे. या पार्कमध्ये जवळपास २ लाख रोजगार निर्माण होतील. यामुळे या परिसराचा संपूर्ण मेकओव्हर होईल. त्यातून देशाच्या विकासालाही हातभार लागेल.

राहुल गांधी यांनी आपल्या अमेरिका दौऱ्यात आरक्षण रद्द करण्याचे कथित वादग्रस्त विधान केले होते. ते म्हणाले होते, देशात सर्वांना समान संधी मिळू लागतील, तेव्हा काँग्रेस आरक्षण संपुष्टात आणण्याच्या मुद्यावर विचार करेन. पण सध्या भारतात अशी कोणतीही परिस्थिती नाही. तुम्ही आर्थिक आकडेवारी पाहता तेव्हा ही बाब प्रकर्षाने जाणवते. सद्यस्थितीत आदिवासींना १०० रुपयांतून केवळ १० पैसे मिळतात. दलितांना १०० रुपयांतून केवळ ५ रुपये मिळतात. ओबीसींनाही जवळपास एवढाच वाटा मिळतो.भारतातील बिझनेस लिडर्सची यादी पाहिली तर टॉप २०० मध्ये केवळ १ ओबीसी आहे. वस्तुतः त्यांची संख्या मात्र ५० टक्क्यांवर आहे. पण आम्ही या आजारावर कोणताही उपचार करत नाही, असे ते म्हणाले होते

## कृषी महाविद्यालय,उमरखेडच्या दोन विद्यार्थिनी ॲक्सीस बँकेच्या असिस्टंट मॅनेजर पदी नियुक्ती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड | सय्यद रहीम राजा**

कृषि महाविद्यालय,उमरखेड येथील शेतकरी कुटुंबातील विद्यार्थीनींचे नेत्र दीपक सुयश महाविद्यालयाच्या कु.वैष्णवी जस्वनील चप्पलवाड व साक्षी नंदकिशोर डुकरे या दोन्ही विद्यार्थिनींचे ॲक्सीस बँकेच्या सहाय्यक व्यवस्थापक या पदावर निवड झाली आहे.





डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला यांच्यातर्फे राबविण्यात आलेल्या क्सीस बँकेकरीता विद्यापीठातील एकुण २९ कृषि महाविद्यालयानी भाग घेऊन राबविण्यात आलेल्या या मुलाखत उपक्रमात एकुण ४० विद्यार्थीनी मधून अंतिम मुलाखती नंतर १० मुलींची निवड करण्यात आली असून त्यात कृषि महाविद्यालय, उमरखेड च्या विद्यार्थीनी वैष्णवी जस्वनील चप्पलवाड व साक्षी नंदकिशोर डुकरे यांची क्सीस बँकेच्या सहाय्यक व्यवस्थापक (Asst.Manager) या पदावर निवड झाली आहे.


सदर परीक्षेची प्राथमिक फेरीही ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आली होती तदनंतर मुलाखती द्वारे अंतिम निवड करण्यात आली यामध्ये या दोन्ही विद्यार्थिनींनी प्राविण्य प्राप्त करत यश संपादन केले. विद्यार्थिनींनी आपल्या यशाचे श्रेय त्यांचे आई – वडील तसेच महाविद्यालयाला समर्पित केले आहे.

क्सीस बँके तर्फे निवड झाल्यानंतर दोन्ही मुलींच्या पदव्युत्तर शिक्षणाकरिता P.G.Diploma Course चे प्रशिक्षण देण्यात येणार असून पदव्युत्तर शिक्षण व प्रशिक्षण कालावधी दरम्यान मानधन सुध्दा प्रदान करण्यात येणार आहे. सदर प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर वैष्णवी व साक्षी यांची ॲक्सीस बँकेमध्ये सहाय्यक व्यवस्थापक (Asst.Manager) या पदावर नियुक्ती होईल.

शिवाजी शिक्षण संस्थाचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील चोंढीकर,कृषि महाविद्यालयाचे चेअरमन डॉ.विजयराव माने यांनी महाविद्यालयांच्या या कर्तृत्ववान मुलींबद्दल अभिमान व्यक्त करत त्यांचे अभिनंदन केले.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रिजवान अली खान आणि महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी देखील मुलींच्या या यशाबद्दल त्यांचे कौतुक करुन पुढील वाटचाली करीता शुभेच्छा दिल्या.

## मालवाहू ट्रक व बस चा भीषण अपघात सात जण जागीच ठार





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड | विजय रोडे**

गेवराई आगार डेपोची बस क्रमांक चक २० इछ ३५७३ अंबड कडे प्रवाशी घेऊन जात असताना रस्त्यातच मोसंबी घेऊन येणारा ट्रकने बस ला समोरासमोर जोराची धडक दिल्याने बस चालक वाहक बंडू बारगजे सह पाच ते सात प्रवाशी जागीच ठार झाले. बंडू बारगजे हे बस आगारातील एका संघटनेचे अध्यक्ष होते. हा गेवराई अंबड दरम्यान शहापुर (वडोगिद्री) गावाजवळ समोरासमोर भीषण अपघात झाला या अपघातात सात जनाचा जागीच मृत्यू झाला असून, या भीषण अपघातात महिला प्रवाशी यांचा देखील समावेश आहे. इतर प्रवासी जखमी झाले आहेत. हा अपघात एवढा भीषण होता की जखमी झालेल्यांना उपचार करण्यात देखील वेळ मिळाला नाही. स्थानिक नागरिकांनी जखमीना उपचारासाठी अंबड येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असून मृताच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे. या अपघातामुळे रस्त्यावर काही वेळ वाहतूक ठप्प झाली होती.

## खा.अशोकराव चव्हाण यांनी कवळे गुरूजींना खासदार करावे असे जनतेचे मत-भगवान चव्हाण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | बाजीराव गायकवाड**





लोकशाहीमध्ये लोकांनी आपला लोकप्रतिनिधी निवडताना खूप सावधानता बाळगली पाहिजे.एकदा का लोकप्रतिनिधी आपण निवडून दिला तर मग ५ वर्ष तो आपल्या मानगुटीवर बसणार नाही याची काळजी घेतली पाहिजे आपण निवडलेला लोकप्रतिनिधी हा विकासाची जाण असलेला असावा,अभ्यासू असावा, भविष्यवेधी असावा, लोकहीत जपणारा असावा, शेतकरी –कष्टकरी – बेरोजगार – महिला यांना न्याय मिळवून देणारा असावा.आपण ज्या भागाचे नेतृत्व करणार असतो त्या भागाचा सर्वांगीण अभ्यास असणारा असावा.

वारसाहक्काने घर, दार, संपत्ती मिळू शकते, पण विकासाची दृष्टी मिळेल का?

म्हणून सध्या तरी नांदेड मध्ये अतिशय तळागाळातून आलेला,मेहनत, जिद्द आणि विकासाची अचूक दृष्टी असलेला नेता, जो लोकांना न्याय देऊ शकेल असा नेता आणि नेतृत्व मारोतराव कवळे गुरुजी यांच्या रूपाने दिसत आहे.लोकांनी खरंच थोडं राजकारण बाजूला ठेऊन, गुरुजींच्या लोकोपयोगी कामांना पाहिलं पाहिजे.त्यांची जिद्द, मेहनत, विकासाचा दृष्टीकोन आणि अभ्यास लक्षात घेतला पाहिजे आणि त्यांना आपल्या भागाचा एक लोकप्रतिनिधी म्हणून संधी दिली पाहिजे.समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळवून देण्यासाठी कवळे गुरुजी यांनी आजपर्यंत जे यशस्वी प्रयत्न केले आहेत, त्यामुळे खरंच ते एक आदर्श लोकप्रतिनिधी म्हणून शोभतात.लोकांनी माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण साहेब यांनी मारोतराव कवळे गुरूजी यांना लोकसभेचे तिकीट देऊन खासदार करावे असे जनतेचे मत असल्याचे भारतीय जनता पक्षाचे नायगाव तालुका माजी अध्यक्ष भगवान चव्हाण नायगावकर यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले आहे.

गुरुजींना संधी मिळाल्यास खरंच आपल्या नांदेड चे चित्र बदलून जाईल.कारण गुरुजींनी आजपर्यंत मनात एकच गोष्ट ठेऊन विकासाची कामे केलेली आहेत. ते म्हणजे पश्चिम महाराष्ट्राच्या धर्तीवर मराठवाड्याचा विकास करणे.म्हणून कवळे गुरुजी सारखा योग्य लोकप्रतिनिधी निवडला पाहिजे.असेही जनतेचे मत असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

## श्रीगोंद्यात ईद-ए-मिलाद मोठ्या उत्साहात साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा | ज्ञानेश्वर येवले**

ईद-ए-मिलाद-उन-नबी, अर्थात मोहम्मद पैगंबर यांच्या जयंती निमित्त बुधवार दिनांक १८ सप्टेंबर रोजी श्रीगोंदा शहरातून शोभायात्रा अर्थात जुलूस काढण्यात आली .


दरवर्षी पैगंबर जयंतीच्या दिवशी श्रीगोंद्यात मुस्लिम बांधव मोठ्या उत्साहात जुलूस काढतात. यंदा अनंत चतुर्दशीच्या आदल्या दिवशी पैगंबर जयंती होती. त्यामुळे पोलिसांच्या आवाहनाला प्रतिसाद देत मुस्लिम बांधवांनी दि.१६ ऐवजी दि.१८ रोजी जुलूस काढण्याचा निर्णय घेतला.




श्रीगोंद्यात कुरेशी मोहल्ला इथून या जुलुस, शोभायात्रेला सुरुवात झाली. शहरातील झेंडा चौक, संत रोहिदास चौक, छत्रपती शिवाजी चौक, शनिचौक, शेख महंमद बाबा दर्गाह पटांगण, दिल्ली वेस मार्गे जुलूस काढण्यात आला होता, जुलुस मध्ये अंजुमन जमेतुल कुरेशी जमात, शेरे सुल्तान यंग ग्रुप, टीपू सुल्तान यंग सर्कल, लबैंक या हुसेन ग्रुप राजबक्ष सोशल ग्रुप सह सहभागी झाले होते. या दरम्यान सुफी संत शेख महंमद बाबा दर्गाह ट्रस्ट, लबैंक या हुसेन ग्रुप, टीपू सुल्तान यंग सर्कल, शनि मारूती मित्र मंडळ, गफ्फार पठान, मित्र परीवार आर्दीच्या वतीन शहरात ठिक ठिकाणी जुलूस मध्ये सहभागी झालेल्या मुस्लीम बांधवासाठी शरबत, जीलेबी, समोसा, मिठाई अल्पउपहारासह पाणी बॉटल वाटप करण्यात आले.

जुलूस मध्ये नगरसेवक निसारभाई कुरेशी, अतिकभाई कुरेशी, शेख महंमद बाबा यांचे वंशज अजिजभाई शेख, शब्बीरभाई कुरेशी, अल्ताफभाई कुरेशी, सलीमभाई कुरेशी, महंमद भाई कुरेशी, जुनेदभाई कुरेशी, रेहानभाई शेख (मोनू शेठ), अब्दुलबारी कुरेशी, नवाज शेख, फैयाज बेपारी, अतिफ शेख अदीसाह मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी या जुलूस ला भेट देत मुस्लीम बांधवांना शुभेच्छा दिल्या. यावेळी पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

झाडे लावा झाडे जगवा



### चारोळी

मैत्रिचा धागा जपून ठेवावा
तिथे मोकळे होते मनाचे दार
भेदभाव नसतोच येथे अन
जगणं सुंदर होतं फार.

रंजना सानप
मायणी (सातारा)

## राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी घेतले श्री साईबाबा समाधीचे दर्शन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहमदनगर | प्रतिनिधी**

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी आज श्री साईबाबा समाधी मंदिराला भेट देऊन दर्शन घेतले. त्यानंतर त्यांच्या हस्ते पूजा व आरती करण्यात आली. यावेळी राज्याचे महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, पोलीस अधीक्षक राकेश ओला, शिर्डीचे अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर उपस्थित होते. यावेळी राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी द्वारकामाई व गुरस्थान मंदीराचेही दर्शन घेतले. साईबाबा संस्थानच्यावतीने श्री साईबाबांची मूर्ती देऊन राज्यपाल महोदयांचे स्वागत करण्यात आले. तत्पूर्वी, राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचे शिर्डी विमानतळावर आगमन झाले. पालकमंत्री श्री. विखे पाटील यांनी जिल्ह्याच्यावतीने त्यांचे स्वागत केले. यावेळी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर आदी उपस्थित होते.




# सत्यशोधक प्रा.श्रीकृष्ण बनसोड यांच्या महात्मा फुले आणि अस्पृश्यांची कैफियत पुस्तकातून विषमताधिष्ठित समाज व्यवस्थेची बायपास सर्जरी



**समाज भूषण प्रा.श्रीकृष्ण बनसोड लिखित महात्मा फुले आणि अस्पृश्यांची कैफियत या परिवर्तनवादी पुस्तकाचे प्रकाशन दि.२२ सप्टेंबर २०२४ ला काँग्रेस नगर येथील श्री संत रविदास सांस्कृतिक भवन येथे मान्यवरांच्या हस्ते संपन्न होत आहे . प्रकाशनाच्या निमित्ताने या पुस्तकावरील खालील समीक्षा आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या दि.२२ सप्टेंबर २०२४ च्या अंकात प्रकाशित कराल, ही नम्र विनंती.**

**आपला विश्वासू**

**प्रा.अरुण बाबारावजी बुंदेले,रुक्मिणी नगर ,अमरावती .**




**लोकनेता न्यूज नेटवर्क**

अमरावतीच्या सामाजिक, शैक्षणिक आणि साहित्यिक चळवळीतील गेल्या पन्नास वर्षापासूनचे समता सैनिक प्रा.श्रीकृष्ण बनसोड यांनी १९७२ ला सर्वप्रथम महात्मा फुले विविध दर्शन ह्या वैचारिक ग्रंथातून जोतीरावांच्या विविधांगी कार्यावर प्रकाश टाकला.त्यांनी निवडुंगाची फुले,जीवन ज्योती, झेप,राष्ट्र वेदना या चार प्रातिनिधिक काव्यसंग्रहानंतर स्वरचित कवितांचा कालचक्र हा स्वतंत्र काव्यसंग्रह १९८९ मध्ये प्रकाशित केला,त्यानंतर सत्यशोध,माळी समाज काल - आज आणि उद्या,विद्रोही महात्मा,ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची काव्य संपदा, माझ्या अनुभवाचे सार इत्यादी पुस्तके प्रकाशित केली तसेच फुले - शाहू- आंबेडकर व सावित्रीबाई फुले यांच्या सत्यशोधकीय विचाराचा प्रचार करण्यासाठी गेल्या ३७ वर्षापासून वऱ्हाड विकास मासिक प्रकाशित करतात.आज महात्मा फुले आणि अस्पृश्यांची कैफियत हे प्रा.श्रीकृष्ण बनसोड यांचे पुस्तक प्रकाशित होत आहे.महात्मा फुले यांनी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्र तसेच कामगार,शेतकऱ्यांच्या न्याय हक्कांसाठी लढा दिला. महात्मा फुले आणि अस्पृशांची कैफियत या पुस्तकात फुलेंच्या अस्पृश्य व अस्पृश्यता निवारण विषयक क्रांतिकार्यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.महात्मा फुलेंच्या अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीला केंद्रस्थानी ठेवून त्यासंदर्भात आठ दीर्घ प्रकरणाच्या माध्यमातून सर्वकश विचारमंथन करण्यात आले आहे.महात्मा फुलेंच्या सामाजिक क्रांतीच्या तत्त्वज्ञानाचे स्वरूप हे वर्गीय होते.त्यांनी प्रचलित धार्मिक परंपरा नाकारल्या होत्या.त्यांच्या कल्पनेतील धर्माचे स्वरूप हे वैश्विक होते.त्यांनी सामाजिक समस्यांच्या तळाशी जाऊन व प्रतिसंस्कृती निर्माण करून प्रभावी संस्कृतीचा पर्याय सुचविला.विद्रोही सांस्कृतिक चळवळ,हिंदू प्रतिक्रांतीचा शोध, धर्माचे वैश्विक स्वरूप,दलित मुक्ती - मानव मुक्तीची चळवळ, जातीभेदाच्या परंपरावादी घडीला सुरुंग,शोषणविरहित समाजाचे स्वप्न,तुम्ही शूद्र नाही,शूद्रातीशुद्रांची दास्यमुक्ती,जातीअंताची चळवळ,वैश्विक समता मूल्यांचा पुरस्कार,अमेरिकेतील निग्रो व भारतातील शूद्र शोषणाच्या यंत्रणा,अस्पृश्यता कशी निर्माण झाली ?, बौद्ध धम्माची दीक्षा, आमचा धर्म कोणता ?,महार वाड्यातून धर्म दिंडी काढा,कोणी ब्राह्मण नसतो- कोणी चांडाळ नसतो,जातीयता तोडून माणसं जोडा,हिंदू मुस्लिम एकता, अंधश्रद्धेची पोथीनिष्ठ बंधने, राजर्षी शाहू महाराज आणि अस्पृश्यता मुक्तीची चळवळ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा दलितांच्या उद्धाराचा नवा वैचारिक संघर्ष,सावित्रीबाई फुलेंचा जातीअंताचा लढा, प्रबोधनकार ठाकरे आणि भटभिक्षुकांची रोजगार हमी योजना,सत्यशोधक समाज आणि अस्पृश्यता विरोधी चळवळी,हिंदू सुवर्ण आणि दलित अस्पृश्य यांच्यातील सांस्कृतिक संघर्ष अशा प्रत्येक मानवी जीवनाशी संबंधित विषयावर सर्वकश व सर्व समावेशक विचार महात्मा फुले आणि अस्पृश्याची कैफियत या पुस्तकांमधून लेखक प्रा.श्रीकृष्ण बनसोड यांनी साध्या ,, सोप्या आणि प्रासादिक शैलीत मांडलेली आहे.



प्रा.अरुण बाबारावजी बुंदेले, अमरावती.

मनोगतामध्ये लेखक प्रा.श्रीकृष्ण बनसोड यांनी महात्मा फुले यांनी केवळ दलित वर्गाच्या उद्धारासाठी क्रांतिकार्य केलं नाही तर ते कार्य सकल मानवजातीच्या उद्धारासाठीसाठी होते.जातिभेद व धर्मभेद विरहित होते.दलित , विधवा व अन्यायग्रस्त वंचित ब्राह्मण महिलांसाठी होते. शुद्रातीशुद्र समाजघटक,कामगार,शेतकरी , शेतमजूर आदींच्या समस्या या महात्मा फुले यांच्या अभ्यासाचे - चिंतनाचे तसेच कार्याचे विषय होते. असे म्हटले आहे. हे महात्मा फुलेंचे कार्य प्रस्तुत पुस्तकात विविध प्रकरणातून सांगण्याचा त्यांनी प्रयास केला आहे.

खिस्त महंमद  
मांग ब्राह्मणाशी ।।  
धरावे पोटाशी  
बंधुपरी ।।

या अखंडामध्ये जोतीरावांनी मानवधर्माचे सार सांगितले आहे .महात्मा फुलेंनी शोषण विरहित समाजाचे स्वप्न बघितले होते आणि ते साकार करण्याचा जीवनभर प्रयत्न केला .

अस्पृश्यता निवारणासाठी संत व समाज सुधारकांचे कार्य या प्रकरणात लेखक प्रा.श्रीकृष्ण बनसोड यांनी भगवान महावीर, श्री चक्रधर स्वामी ,संत सावता महाराज,महात्मा बसवेश्वर,संत गुरु रविदास महाराज,संत कबीर, संत तुकाराम महाराज, दक्षिणेकडील भारतातील केरळ राज्यातील नारायणा गुरु,संत नामदेव महाराज,मंगरूळ दस्तगीर या खेड्यातील संत श्री हरी उर्फ गणपती महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,संत गाडगेबाबा,ज्ञानेशकन्या संत गुलाबराव महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव देशमुख,छत्रपती सयाजीराव गायकवाड,गो.ग.आगरकर, राजाराम मोहन राय ,महर्षी वी.रा. शिंदे,कर्मवीर भाऊराव पाटील,धोंडो केशव कर्वे, ताराबाई शिंदे ,फातिमा शेख, मदर टेरेसा यांच्यासह ज्ञात अज्ञात समाजसुधारकांनी अस्पृश्यता निवारणासाठी व सामाजिक समता आणि राष्ट्राच्या एकात्मतेसाठी कसे प्रयत्न केले, हे या पुस्तकात लेखक

प्रा.श्रीकृष्ण बनसोड यांनी सांगितले आहे. स्वातंत्र्य,समता, बंधुत्व ही त्रीसूत्री आणि शोषणमुक्त लोकशाही व्यवस्था हे ब्रीद देशातील थोर विचारवंतांनी सामाजिक व राजकीय परिवर्तनाच्या चळवळीत मांडले असल्याचे श्री बनसोड यांनी येथे सांगितले आहे.

ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचा जातीअंताचा लढा या प्रकरणांमध्ये ,

शूद्र आणि अतिशूद्र  
अज्ञानाने पछाडले ।  
देवधर्म रूढी अर्ची  
दारिद्र्याने गाठाळले ।।

हा विचार सांगितलेला आहे.अस्पृश्य असलेल्या पांडुरंग या व्यक्तिसाठी क्रांतिज्योती सावित्रीबाईंनी हौतात्म्या कसे पत्करले ? हे सुबोध शैलीत सांगितले आहे आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी दलित आदिवासीसह सर्व जाती धर्मातील मुलींना शिक्षणाची कशी कवाडे खुली केली याचे विवेचन केलेले आहे .सत्यशोधक समाज आणि अस्पृश्यता विरोधी चळवळी या प्रकरणांमध्ये लेखक प्रा.श्रीकृष्ण बनसोड यांनी सांस्कृतिक क्रांतीचा उषा:काल,पहिली अस्पृश्यता परिषद ,सत्यशोधक समाज ही लोक चळवळ, ब्राह्मणेतरांची पहिली प्रांतिक परिषद,महाराष्ट्राबाहेरील अस्पृश्यता विरोधी चळवळ, निरंकारी चळवळ अशा अनेक चळवळींनी - परिषदांनी अस्पृश्यता निर्मूलनाचे कार्य कसे केले हे सांगण्याचा प्रयास येथे केलेला आहे.

महात्मा फुले आणि अस्पृश्यांची कैफियत हे प्रा. श्रीकृष्ण बनसोड लिखित पुस्तक संग्राह्य असून वाचन संस्कृती वृद्धिंगत करणारे आहे. या पुस्तकात विषमताधिष्ठित समाजव्यवस्थेची जणू बायपास सर्जरी केलेली आहे,असे वाचनाअंती वाचकांना वाटेल यात शंका नाही.

सुधीर प्रकाशन वर्धाचे श्री सुधीर गवळी यांनी अतिशय आकर्षक स्वरूपात हे पुस्तक तयार केले असून पुस्तकाच्या शेवटी ३२ पुस्तकांची दिलेली संदर्भसूची व लेखक प्रा.श्रीकृष्ण बनसोड यांचा संक्षिप्त परिचय त्यांनी केलेले सामाजिक, शैक्षणिक व साहित्यिक कार्य असून आकर्षक मुखपृष्ठ आणि मलपृष्ठ असलेल्या या वैचारिक पुस्तकाचे वाचक स्वागत करतील यात शंका नाही.

**पुस्तकाचे नाव : - महात्मा फुले आणि अस्पृश्यांची कैफियत**  
**लेखक : - प्रा.श्रीकृष्ण बनसोड**  
**प्रकाशक : - सुधीर प्रकाशन, वर्धा.**  
**पृष्ठ संख्या : - १२०**  
**मूल्य : - २४० / -**

# ओंकार फंड यांची जगविख्यात पीडब्ल्यू सी ग्रुप कंपनीमध्ये इंटेलिजन्स इन ऑटोमेशन क्षेत्रात सल्लागारपदी निवड

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**रांजणगाव गणपती । प्रतिनिधी**



औद्योगिकीकरण व अष्टविनायक तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध असलेले शिरुर तालुक्यातील रांजणगाव गणपती येथील प्रगतशील शेतकरी संभाजीराव फंड यांचा नातू अभियंता ओंकार फंड यांची जगविख्यात (पीडब्ल्यूसी ग्रुप )कंपनीमध्ये इंटेलिजन्स इन ऑटोमेशन क्षेत्रात ,सल्लागारपदी ,निवड झाली असून त्याला वार्षिक तीस लाख वेतनाची संधी देऊ केलीआहे.

ओंकार फंड यानेआपले प्राथमिक शिक्षण महात्मा गांधी विद्यालय राजगुरुनगर खेड आणि उच्च शिक्षण सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथून बी टेक मेकॅनिकल ही पदवी संपादन केली असून कॅट -२०२२ स्पर्धा परीक्षा द्वारे त्यांना भारतीय व्यवस्थापन संस्था (आय आय एम पवई मुंबई )येथे प्रवेश मिळविला होता सध्या येथे ते द्वितीय वर्षांमध्ये शिक्षण घेत आहेत.

ओंकार हा २२० के व्ही वीज उपकेंद्र काठापूर ता आंबेगाव (महापारेषण )मधील अधिकारी सुदाम फंड यांचा चिरंजीव आहे तसेच हैद्राबाद येथील मॅनेज संस्थेतील उपसंचालक डॉ शहाजी फंड आणि शामली उद्योग समूहाचे अध्यक्ष/ उद्योजक व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य नेताजी फंड यांचे पुतणे आहेत.

कष्ट आणि जिद्द या जोरावर कोणतेही यश अवघड नसते शहरी भागातील मुलांपेक्षा ग्रामीण भागामध्ये शिक्षण घेतलेल्या मुलांमध्ये प्रचंड क्षमताअसते यूपीएससी/ एमपीएससी सोबत खासगी उद्योग जगतात अनेकमोठ्या संधी उच्च गुणवंताना उपलब्ध आहेत त्या साठीग्रामीण मुलांनी तिकडेलक्ष देणे गरजेचे आहे असे ओंकार फंड यांनी सांगितले. त्यांना शरीर सौष्ठव आणि क्रिकेट या खेळाची विशेष आवड असून बॉडी बिल्डिंग क्षेत्रातील अनेक पारितोषिके मिळाली आहेत. त्यांच्या निवडीबाबत समाजामधून त्याचे कौतुक व अभिनंदन होत आहे.

# विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन आवश्यक-विठ्ठलराव दंदे

## माणिकनगर येथे गणेशोत्सव स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न





**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**बीड । विजय रोडे**

परळी शहरातील माणिक नगर गणेश फेस्टिवल मंडळाच्या वतीने प्रमुख मार्गदर्शक व माजी नगरसेवक विठ्ठलराव दंदे यांच्या नेतृत्वात गणेशोत्सवानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांसह स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

गेल्या अनेक वर्षांपासून माणिक नगर फेस्टिवल मंडळाने सामाजिक कार्य आणि संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी गणेशोत्सव मिरवणूक, सजावट, संगीत खुर्ची, रांगोळी स्पर्धा आणि होम मिनिस्टर स्पर्धा आयोजित केल्या आहेत. या स्पर्धेत शहरातील २०० हून अधिक महिला व विद्यार्थिनींनी उत्साहाने सहभाग घेतला.संगीत खुर्ची स्पर्धेत प्रथम अंकिता खेत्रे, होम मिनीस्टर स्पर्धेत प्रथम अनुसया जातकर, द्वितीय सिमा बेदरकर यांनी बक्षीस मिळविले. स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या विजेत्यांना पारितोषक मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी विठ्ठल दंदे व ज्येष्ठ नेते माधवराव ताटे यांनी आपल्या मनोगतात स्पर्धांच्या महत्त्वाबद्दल विचारले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी अशा स्पर्धांचे आयोजन अत्यंत आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्यांमध्ये ज्येष्ठ नेते माधवराव ताटे, प्रशांतकुमार शास्त्री, काँग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष वैजनाथ गडेकर, सामाजिक कार्यकर्ते रामेश्वर खर्डे, शिवाजी म्हाळगी, दिगंबरराव तपासे, वसंतराव कुलकर्णी, उमाकांत म्हाळगी, विजय सदरे, राजाभाऊ शिंदे आणि गजानन पांढरे, उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन दत्ता म्हाळगी, गणेश ठाकुर, निखील शास्त्री, गणेश सदरे, पांडुरंग खर्डे, ओम खर्डे यांनी केले. गणेश मुर्तीची स्थापना किशोरभाऊ दंदे यांच्या हस्ते करण्यात आली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माणिक नगर गणेश फेस्टिवल मंडळाचे अध्यक्ष आणि सर्व पदाधिकारी सदस्यांनी अथक परिश्रम घेतले. या कार्यक्रमामुळे सामाजिक एकजुटीला वाव मिळाला आणि सांस्कृतिक वारसा जपला गेला.

# कुल,थोरात,पवार यांनी मला विधानसभेला मदत करावी-मा.नगराध्यक्ष बादशाहभाई शेख

## दौंड विधानसभा पूर्ण ताकतीने लढविण्याचे दिले संकेत

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**दौंड । बबनराव धायतोंडे**

दौंड तालुक्यातील राजकीय वातावरण तापू लागेल असून सर्वजण आपल्या नेत्यांविषयी बेरीज वजाबाकीची गणिते करू लागले आहेत. आता यात भर पडली आहे माजी आमदार रमेश थोरात यांचे ३४ वर्षांपासूनचे कट्टर कार्यकर्ते दौंडचे माजी नगराध्यक्ष बादशाहभाई शेख यांची,गेल्या ३४ वर्षांपासून बादशाहभाई शेख हे दौंड नगरपरिषदेला निवडून येत आहेत.त्यांनी पत्रकारांना मुलाखत देताना सांगितले की आपण दौंड विधनसभा नुवडणुक पुर्ण ताकतीने लढवणार असल्याचे जाहीर केले आहे. त्यांच्या या निर्णयामुळे दौंडचे माजी आमदार रमेश थोरात यांच्या गटात खळबळ उडाली आहे.तर कुल गट त्यांच्या राजकीय हालचालिंवर सावध पवित्रा घेताना दिसत आहे.बादशाहभाई शेख यांनी बोलताना सांगितले मी गेली ३४ वर्षे ज्यांचे काम केले त्यांनी मला आणि माझ्या कुटुंबाला अडचणीच्या काळात वाऱ्यावर सोडले,ज्यावेळी माझी काहीच चूक नसताना मला ५२ दिवस जेलमध्ये बसावे लागले.आणि मी ज्यांच्यासाठी ३४ वर्षे इमाने,इतबारे काम केले त्यांनी त्यावेळी माझ्यासाठी काहीच केले नाही.याची माझ्या मनात सल आहे.

मी कै.आमदार सुभाष कुल,माजी.आमदार रंजनाताई कुल आणि माजी.आमदार रमेश थोरात यांचेही काम ईमादारीने केले आहे.मात्र प्रत्येकवेळी कुल- थोरात हिच नावे पुढे येतात.तिसरे नाव पुढे



येऊ दिले जात नाही.आणि जी नावे आता पुढे येत आहेत त्यामध्ये एकही बहुजन नाव पुढे येताना दिसत नाही.त्यामुळे वर्षानुवर्षे निवडून येणाऱ्या या सर्वांनी मिळून एकदा विधानसभेला एक बहुजन समाजाचा चेहरा दिला तर हरकत नाही मात्र तसे होताना दिसत नाही.ज्यावेळी मला नाहक एका प्रकरणात अटक केली गेली त्यावेळी मी ज्यांच्यासाठी इतर लोकांचा कायम वाईटपणा घेऊन काम केले त्यांच्याकडून मला आणि माझ्या कुटुंबाला त्यावेळी लागणारी मदत केली गेली नाही. हा अनुभव आपणांस आल्याचे त्यांनी सांगितले. नगरपरिषदेला सलग आमच्या सारख्या सहा-सात वेळा निवडून आलेल्या लोकांवर ही परिस्थिती येत असेल तर सर्वसामान्यांचे काय..? त्यामुळे आता स्वतःची ताकत स्वतःच तयार करावी लागेल दुसऱ्यांवर विसंबून राहून काही फायदा नाही.आता आपण एकतर मराठा आरक्षण योद्धा जरांगे पाटील, वंचित बहुजन आघाडी किंवा अन्य पक्षांकडून निवडणूक लढविण्यासाठी विचार करत असल्याचे त्यांनी सांगितले.

माजी आमदर रंजनाताई कुल,माजी.आमदार रमेश थोरात,दौंड पंचायत समितीचे माजी सभापती आप्पासाहेब पवार या सर्वांना मी एकेकाळी राजकारणात मदतच केली आहे.त्यामुळे या सर्वांनी मला विधानसभेला मदत करावी आसा मिस्किल टोला बादशाहभाई शेख यांनी शेवटी लगावला.

# दारूबंदी व अवैध धंद्याचा विरोधात डॉ.बछिरेंच्या नेतृत्वात महिलांचा एल्गार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**



लोणार १९ दारूबंदी व अवैध धंद्याचा विरोधात शिवसेना उबाठा चे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरेंच्या नेतृत्वात पोलीस स्टेशन लोणार येथे महिलांनी एल्गार पुकारला गत दोन वर्षापासून पोलीस प्रशासन व राजकीय पुढार्यांच्या आशीर्वादाने लोणार तालुक्यात ऑनलाईन चक्री, सट्टा, वरली मटका सारखे अवैध धंदे गावठी हातभट्टीची दारू, अवैध गुटखा, खुलेआम सर्रासपणे विक्री सुरू आहे या अवैध धंद्यामुळे कित्येक संसार परिवाराची राख रांगोळी झाली आहे राजकीय नेते मंडळीच्या आशीर्वादाने, पोलीस प्रशासन या अवैध धंद्यावर कोणतीही कार्यवाही करत नाही लोणार तालुक्यातील गोत्रा या गावातील शेकडो महिला व पुरुषांनी शिवसेनेचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे, शहर प्रमुख गजानन जाधव, युवा शहर प्रमुख श्रीकांत मादनकर यांच्या नेतृत्वात पोलीस स्टेशन लोणार वर एल्गार मार्च केला

याप्रसंगी सर्व महिलांनी अवैध धंद्याच्या विरोधात तसेच त्यांना पाठबळ देणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांच्या विरोधात घोषणाबाजी केल्या, जोपर्यंत पोलीस प्रशासन अवैध धंदे अवैध दारू विक्री व दारूची तस्करी करणाऱ्या गाड्या पूर्णतः बंद करत नाही तोपर्यंत पोलिस स्टेशन मधून जाणार नाही असा पवित्राच महिलांनी घेतला त्यावर बीट जमदार गजानन सानप एसीबी चे हवालदार संतोष चव्हाण यांनी डॉ. गोपाल बछिरे, तंटामुक्ती अध्यक्ष शिवाजी घाटे, गजानन जाधव, कासाबाई राठोड, राईबाई शिंदे, पिंटाबाई डाखोरे यांच्या समक्ष सर्व महिला पुरुषांना आश्वासन दिले की, आज नंतर कोणतेही अवैध धंदे या तालुक्यात चालू देणार नाही त्यानंतर महिलांनी आपले आंदोलन मागे घेतले. याप्रसंगी शिवसेना युवा शहर प्रमुख श्रीकांत मादनकर, गजानन वैद्य, मदन धोत्रे, शिवाजी पवार, राजू चव्हाण, पंढरी धोत्रे, गोपाल वैद्य, शिवाजी धोत्रे, शत्रुघ्न धोत्रे, सखाराम तांबारे, रामू घाटे, पुंजाजी वाणी, गणेश पाठे यांच्यासह शेकडो महिला भगिनी माता उपस्थित होत्या

# परळी महावितरणात वीज बिल भ्रष्टाचार प्रकरणी तक्रार देऊन दखल नाही

## २० दिवसांत कारवाई का नाही स्थानिक अधिकाऱ्याचे सगणमंत आहे का?

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

परळी महावितरण कार्यलयात वीज बिल वितरण प्रकरणात परळी कार्यलयाने ज्या एजन्सीला वीज बिल वितरण करण्याचे कार्यरभ आदेश दिले होते. या कडे जिल्ह्यधिकारी यांनी लक्ष दयावे अशी मागणी विज ग्राहक करत आहेत.त्या एजन्सीने बिल वितरण पत्रक बाजारात रद्दी दुकानात विकून मोठा भ्रष्टाचार केला होता आणि परळी वीज ग्राहकासह परळी महावितरण कार्यलयाची मोठी फसवणूक केली असल्याचे उघड झाले होते म्हणू त्या एजन्सीला कायम काळया यादीत टाकून ज्या कोणी संबंधित अधिकारी या मध्ये शामिल असल्यास निलंबनाची कारवाई करावी अशी तक्रार ३१ /८/ २०२४ रोजी विभागिय कार्यलयात आणि परळी कार्यलयात केली असून तक्रार करून वीस दिवस उलटून गेले आहेत मात्र कोणत्याही कार्यलयाने कसलीही कारवाई केली नसल्याने परळीत वीज ग्राहक आणि तक्रारदार यांनी स्थानिक अधिकारी सगणमंत आहे का अशी चर्चा करत आहेत तेव्हा आठ दिवसांत या एजन्सीवर कारवाई केली नाही तर वरिष्ठां कडे औरंगाबाद आणि मुबई ठिकाणी समक्ष भेट देऊन तक्रार आणि जो काही भ्रष्टाचार केल्याचा दस्तावेज असेल तो समक्ष देऊन कारवाई करावी अशी विनंती आणि परळी कार्यलयाचा मासिक लेखाजोखा घ्यावा अशी तक्रार आणि विनंती करणार असल्याचे तक्रारदार यांनी म्हंटले आहे वीस दिवसात का कारवाई केली नाही आणि त्या एजन्सीवर कार्यलयात बंदी घातली नाही याची सुद्धा माहिती वरिष्ठांना द्यावी लागणार आहे तेव्हा आठ दिवसांत त्या एजन्सीवर करावी करावी अशी पुन्हा तक्रारदार यांनी मागणी केली आहे.

# ॲड.नरसिंह जाधव यांच्या संपर्क कार्यालयाचे खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते उद्घाटन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क


**पाटोदा । प्रतिनिधी**



राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या विधी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष तथा मराठवाडा प्रमुख व आष्टी विधानसभा मतदार संघातील इच्छुक उमेदवार ड.नरसिंह जाधव यांच्या आष्टी येथील संपर्क कार्यालयाचे उद्घाटन रविवारी दिनांक २२/०९/२०२४ रोजी खा. बजरंग बप्पा सोनवणे यांच्या हस्ते करण्यात येणार असून, या कार्यक्रमास आष्टी/पाटोदा/शिरूर तालुक्यातील नागरिकानी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन ड.नरसिंह जाधव यांनी केले आहे. या कार्यक्रमास राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष आमदार संदीप क्षीरसागर, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख, माजी आमदार राजेंद्र जगताप, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे डॉक्टर सेलचे प्रदेशाध्यक्ष नरेंद्र काळे, प्रदेश उपाध्यक्ष बाळासाहेब मिसाळ, डॉ.विलास सोनवणे, प्रदेश सरचिटणीस प्रा.सुशिलाताई मोराळे, आष्टी तालुका अध्यक्ष अण्णासाहेब चौधरी, प्रदेश सरचिटणीस बापूसाहेब डोके, माजी पंचायत समिती सदस्य गुलाबराव घुमरे, किशोर हंबर्डे, अमोल तरटे, कॉ. महादेव नागरगोजे, शेकापचे जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप, जिल्हा कार्यकारिणी सदस्य ड. सय्यद वहाब, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष डॉ.नदीम शेख, जिल्हा सरचिटणीस गणीभाई, अतुल शिंदे, शिवाजी पारखे, जिल्हा उपाध्यक्ष महादेव साके, दादासाहेब झांजे, गंगा आबा आजबे, जिल्हाध्यक्ष लिगल सेल सतीश गाडे, मुकरम पठाण,ज्ञानेश्वर नाईकनवरे आदी सह महाविकास आघाडीचे आजी माजी पदाधिकारी उपस्थीत राहणार असून या कार्यक्रमास आष्टी मतदार संघातील नागरिकांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन ड.नरसिंह जाधव यांनी केले आहे.

# शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासाठी २४ सप्टेंबर ला उपविभागीय कार्यालय येथे भव्य मोर्चा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**

तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासाठी शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने २४ सप्टेंबर २०२४ रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

ओला दुष्काळ जाहीर करणे, सरसकट पिक विमा लागू करणे, बॅक वॉटर मुळे झालेल्या नुकसानाचे तात्काळ भरपाई मिळावी या प्रमुख मागण्यासह विविध मागण्यासाठी धर्माबाद येथे शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने उपविभागीय कार्यालय येथे महामोर्चा चे आयोजन करण्यात आले असल्याचे निवेदन उपविभागीय अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, तहसीलदार व पोलीस निरीक्षक यांना देण्यात आले आहे.

तरी तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी उपविभागीय कार्यालय येथे या भव्य महामोर्चा मध्ये सामील व्हावे असे आवाहन शेतकरी संघर्ष समिती धर्माबाद याच्या वतीने करण्यात आले आहे.

# पंतप्रधान मा.नरेंद्र जी मोदी यांचे कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण जन शिक्षण संस्थान बीड कार्यालयात संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । प्रतिनिधी**



जन शिक्षण संस्थान बीड कार्यालय येथे आयोजित कार्यक्रमात प्रमुख उपस्थित जिल्हा खादी ग्रामोद्योग अधिकारी श्री डी व्ही फताटे, आर सी इ टी आई चे संचालक श्री आत्माराम दगडे, विश्वकर्मा योजनेचे जिल्हा समन्वयक श्री अनिरुद्ध काळे,आय टी आय च्या पवार मॅडम, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जन शिक्षण संस्थान बीड कार्यक्रम अधिकारी सौ सीमाताई मनूरकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

श्री डी व्ही फताटे यांनी प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेचे बीड जिल्ह्यातील कार्याबद्दल माहिती दिली. श्री आत्माराम दगडे यांनी जन शिक्षण संस्थान बीडच्या माध्यमातून कौशल्य विषयक प्रशिक्षण बरोबरच चालणाऱ्या विविध योजनेची माहिती सांगून पी एम विश्वकर्मा योजनेअंतर्गत बीड जिल्ह्यात उत्तम प्रशिक्षण सुरू असल्याचे सांगितले. अध्यक्षीय मार्गदर्शन प्रसंगी सौ सीमा ताई मनुरकर यांनी जन शिक्षण संस्थान बीड द्वारा सुरू असलेल्या प्रशिक्षणाबरोबरच इतर उपक्रमांची माहिती दिली. ग्रामोदय गीत सौ स्नेहल केवडकर यांनी सादर केले तर सहायक कार्यक्रम अधिकारी श्री सुदाम पालकर यांनी विश्वकर्मा योजनेवर आधारित कविता सादर केली. पी एम विश्वकर्मा योजनेचे यशोगाथा श्री राजेन्द्र घोडके यांनी आपले मनोगत व्यक्त केले, विश्वकर्मा योजनेचे सध्या सुरू असलेल्या बॅच चे प्रशिक्षार्थी शरद रत्नपारखे , गणेश पांचाळ, यांचे मनोगत झाले. याच कार्यक्रमात पी एम विश्वकर्मा योजनेअंतर्गत पूर्ण झालेल्या प्रशिक्षार्थ्यांस मान्यवरांच्या हस्ते प्रमाण प्रदान करण्यात आले. सुत्रसंचलन सहायक कार्यक्रम अधिकारी सौ स्वाती जैन यांनी केले तर आभार श्री सुदाम पालकर यांनी व्यक्त केले कार्यक्रमासाठी २५० पी एम विश्वकर्मा प्रशिक्षणार्थी, जन शिक्षण संस्थान बीडच्या विविध प्रशिक्षणाच्या ७० प्रशिक्षणार्थी अशी ३२० महिला पुरुषांची उपस्थिती होती. या कार्यक्रमानंतर सर्वांनी वर्धा येथील कार्यक्रमात प्रधानमंत्री आदरणीय नरेंद्र जी मोदी यांच्या हस्ते ७५००० हजार लाभार्थी यांना विविध योजनांचे लाभ उद्धठण व काहीना प्रत्यक्ष लाभ प्रदान विविध योजनांचा शुभारंभ व त्यांचे मार्गदर्शनाचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जन शिक्षण संस्थान बीड चे सर्व कार्यकर्ते, प्रशिक्षक श्री नितीन क्षीरसागर,श्री महेश सोनवणे, श्री विशाल वाघमारे व प्रशिक्षणार्थी यांनी सहकार्य केले.

# पुणे जिल्ह्यातील महसूल अधिकारी आणि खडी क्रशर मालक यांचे कॉल रेकॉर्डिंग तपासा-हनुमंत जांबले

## महसूलमंत्र्यांकडे ETS मोजणीसाठी केली मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

वासुंदे ता.दौंड येथील खडी क्रेशर चा पंचनामा सध्या चर्चेत आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून वासुंदे येथे मोठ्या प्रमाणात बोगस उत्खनन चालू आहे. स्थानिकांनी आवाज उठवला असता त्यांच्यावरती खोटे गुन्हे दाखल केले जातात त्यांना दमदाटी केली जाते.आणि त्यांचाआवाज दाबण्याचे काम चालू आहे.

वासुंदे येथील सामाजिक कार्यकर्ते हनुमंत जांबले यांनी जिल्ह्यातील बड्या महसूल अधिकाऱ्यांचे आणि खडी क्रशर मालकांचे कॉल रेकॉर्डिंग तपासण्याची मागणी करून खडी क्रशरच्या उत्खनाबाबत एढड मोजणीची मागणी केली आहे.

कॉल रेकॉर्डिंग ची तपासणी केल्यास आर्थिक देवाणघेवाण झाल्याचे स्पष्ट होणार आहे.असे हनुमंत जांबले यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. सध्या हा विषय ऐरणी वरती आला असून सर्वत्र दौंड तालुक्यात मोठी चर्चा चालू आहे.

वारंवार पाठपुरावा घेत असलेले वासुंदे गावातील ग्रामस्थ हनुमंत जांबले यांना मात्र संबंधित प्रशासकीय अधिकारी टोलवाटोलवीची उत्तरे देतात. आणि खडी क्रेशर ठेकेदार मात्र रात्रीच्या वेळी खडी क्रेशर चालवून नोटांचे बंडल कमवताना दिसतात.आणि शासनाच्या डोळ्यात धूळ टाकून करोडो रुपयांना शासनाला चुना लावतात.

स्थानिक ग्रामस्थांनी आवाज उठवल्यानंतर संबंधित प्रशासकीय अधिकारी दौंड तालुक्यातील महसूल विभाग यांनी महाराष्ट्र बोर्ड खनिज उत्खनन विकास व प्रीनियमन नियम २०१३ मध्ये ७१ नुसार प्रत्येक खडी क्रेशर धारक यांनी व्यापारी परवाना घेणे बंधनकारक असते. खडी क्रेशर चा व्यापारी परवाना देत असताना अनेक नियम व अटी लागू असतात पण वासुंदे येथील खडी क्रेशरचे नियम आणि अटींचा धज्या उडवलेला पाहायला मिळत आहे. मग या खडी क्रेशर मालकांनी संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या तोंडावर नोटांचा बंडल फेकला होता का ? अशी चर्चा चालू आहे. खडी क्रेशर परवानगी देत असताना कोणत्याही नियमांचे पालन केलेले दिसत नाही.अशी ग्रामस्थांमध्ये चर्चा आहे. अठरा खडी क्रेशर पैकी सहा खडी क्रशर चे पंचनामे करण्यात आले,आणि सहा खडी क्रशर पैकी एक खडी क्रशर फक्त सील करण्यात आला आहे.म्हणजे पंचनामे मध्ये असं दिसत आहे की पाच खडी क्रेशार मालकांनी कोणत्याही नियमांचे उल्लंघन केले नाही असे पंचनाम्यात सांगण्यात आले आहे.मग स्थानिक ग्रामस्थ खोटे बोलत आहेत का? पंचनामा मध्ये एक खडी क्रेशर सील करण्यात आली आहे. एवढे दिवस सील केलेले खडी क्रशर चालू असताना संबंधित प्रशासकीय अधिकारी झोपले होते का? स्थानिकांनी आवाज उठवल्या नंतरच पाहणी केली का म्हणजे असं दिसत आहे की सांगितलं तेवढच काम करायचं असं प्रशासकीय अधिकाऱ्यांचं काम दिसत आहे.




राहिलेल्या बारा खडी क्रेशर ची पाहाणी कधी होणार अशी स्थानिकांची विचारपूस चालू आहे. मात्र प्रशासकीय अधिकाऱ्यांना काम करण्याऐवजी कारणे मात्र जास्त सांगता येतात.

१८ खडी क्रशर चालू असताना खडी वाहतूकी साठी वापरले जाणाऱ्या वाहनांना जीपीएस प्रणाली असने बंधनकारक आहे. वाहनांची नोंद बंधनकारक आहे. उप प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांचे याकडे लक्ष आहे का? उप प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना हप्ता चालू आहे का?अशी चर्चा ग्रामस्थ करत आहेत.उप प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना कारवाई करण्यासाठी फोन केला असता अधिकारी फोन उचलत नाहीत.बारामती शहर उप प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांकडे गेले असता ते त्यांच्या परिवहन अधिकाऱ्यांना बोला असं सांगून टोलवाटोलविची उत्तरे दिली जातात. मात्र कारवाई करण्यास सर्रास टोलवाटोलवी केली जाते. मंग प्रादेशिक परिवहन अधिकारी आणि खडी क्रेशर मालक वाहतूक उप प्रादेशिक परिवहन यांच्या त काही तडजोडीची बैठक झाली आहे का?असे आरोप ग्रामस्थ करत आहेत. जर तडजोड झाली नसती तर नक्कीच कारवाई झाली असती.वासुंदे येथे चालू असलेल्या उत्खांननची एढड द्वारे मोजणी करण्यात यावी अशी मागणी स्थानिक ग्रामस्थ करत आहेत.संबंधित प्रशासकीय अधिकारी महसूल विभाग कधी एढड मोजणी करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# आरोग्य शिबीरात मोफत रुग्णांची तपासणी ;मालपाणी मतिमंद विद्यालयाचा स्तुत्य उपक्रम-सीईओ करणवाल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

नवीन तंत्रज्ञानामुळे उपचार महागडा झाला आहे. सर्वसामान्य रुग्णांना उपचार करणे आर्थिकदृष्ट्या खर्चिक झाले आहे. अशावेळी सातत्यपूर्ण १३ वर्ष मेंदुचे विकार असलेल्या मुला-मुलींसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करणे हा राजस्थानी एज्युकेशन सोसायटीचा स्तुत्य उपक्रम असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करणवाल यांनी केले आहे.

मुंबई येथील जय वकील फांउडेशन अँड रिसर्च सेंटर, बि. जे. वाडिया चिल्ड्रेन्स हॉस्पिटल, एसआरसीसी चिल्ड्रेन्स हॉस्पिटल व येथील राजस्थानी एज्युकेशन सोसायटीच्या वतीने आर.आर.मालपाणी मतिमंद विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या मेंदुचे विकार असलेल्या मुला-मुलींसाठीच्या आरोग्य शिबिरास गुरूवार दि. १९ सप्टेंबर रोजी प्रारंभ झाला असून शुक्रवारी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी



अधिकारी मिनल करणवाल यांनी आरोग्य शिबिरास भेट देवून याबाबतची माहिती घेतली. यावेळी राजस्थानी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ओमप्रकाश गिल्डा, उपाध्यक्ष कमल कोठारी, सचिव प्रकाश मालपाणी, कोषाध्यक्ष जयप्रकाश काबरा, सहसचिव डॉ. लक्ष्मीकांत बजाज, बनारसीदास अग्रवाल, डॉ. सुरेश दागडीया, अंकित अग्रवाल, संजय बजाज व मूख्याध्यापक नितीन निर्मल यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करणवाल म्हणाल्या की, आरोग्य शिबिराच्या माध्यमातून राजस्थानी शिक्षण संस्था सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे कार्य करत आहे. यापुढेही आरोग्य शिबिराची प्रभावी व परिणामकारक अंमलबजावणी होऊन अधिकाधिक रुग्णांना याचा लाभ व्हावा यासाठी जिल्हा परिषदेच्या वतीने आरोग्य शिबिराच्या यशस्वितेसाठी आवश्यक ते सहकार्य करेल अशी ग्वाही त्यांनी दिली. दरम्यान जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी भेट दिली.


दोन दिवसात जवळपास ६०० रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले आहे. आरोग्य शिबीर यशस्वी व्हावे यासाठी संस्था पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली मूख्याध्यापक नितीन निर्मल यांच्या नियोजनात आर.आर.मालपाणी मतिमंद विद्यालय व श्री रामप्रताप मालपाणी मूक बधिर विद्यालयाचे कर्मचारी परिश्रम घेत आहेत. या आरोग्य शिबिराचा हजारो रुग्णांना लाभ होत आहे. हे आरोग्य शिबीर रुग्णांच्या चेहऱ्यावर हास्य तर त्यांच्या पालकात समाधान व्यक्त करणारे ठरले आहे.

### टीम डॉ.अनैता हेगडेंचे कार्य प्रशंसनीय-डॉ.अजय मालपाणी

**मुंबई येथील जय वकील फांउडेशन अँड रिसर्च सेंटर, बि. जे. वाडिया चिल्ड्रेन्स हॉस्पिटल, एसआरसीसी चिल्ड्रेन्स हॉस्पिटल व येथील राजस्थानी एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून डॉ. अनैता हेगडे, डॉ. अवि शहा व डॉ. अशा चिटणीससह ३५ डॉक्टरांची टीम सकाळी नऊ ते रात्री ११ या वेळेत रुग्णांवर मोफत तपासणी व उपचार करित आहेत. समाजाचे देणे लागतो या भावनेतून केलेले हे कार्य प्रशंसनीय असल्याचे प्रतिपादन अमेरिकेतून या शिबिरास भेट देण्यासाठी आलेल्या रेडीओलॉजिस्ट डॉ. अजय मालपाणी यांनी केले आहे.**

## अतिवृष्टीमुळे सोयाबीन पिकांचे नुकसान शेतकरी त्रस्त

# लोकप्रतिनिधी निवडणूक रणनीती आखण्यात व्यस्त आणि कृषी विभाग ई पिकांची पाहणी करण्याचे सल्ले देण्यात मस्त



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

लिंबागणेश सप्टेंबर महिन्यात बीड जिल्ह्यातील ६१ महसुली मंडळात झालेल्या अतिवृष्टीमुळे खरीप हंगामातील हातातोंडाशी आलेल्या सोयाबीन पिकांचे अतोनात नुकसान झाले असून जिल्ह्यातील ६६८ गावातील २ लाख हेक्टरहुन आधिक क्षेत्र बाधित झाले होते.त्यातच सध्या संथगतीने पंचनामे करण्याचे काम सुरू असुन नुकसान झालेले सोयाबीन किती दिवस शेतातील पाण्यात ठेवायचं असा सवाल शेतकरी वर्गाकडून विचारला जात असुन पाण्यातुन सोयाबीन काढुन काही हाताशी लागेल या आशेने शेतकऱ्यांनी सोयाबीन काढायला सुरुवात केली आहे.ग्रामीण भागातील अनेक शेतात गुडघाभर पाणी साचल्याने खरीपाची संपूर्ण मेहनत आणि खर्च वाया गेल्याने शेतकरी हतबल झाला आहे. याचवेळी लोकप्रतिनिधी आगामी विधानसभा निवडणुकीची रणनीती आखण्यात व्यस्त आहेत तर कृषी विभागातील अधिकारी ई पिक पाहणी करा म्हणत जाहिरात बाजी करण्यात मस्त असुन शेतकऱ्यांचे कोणालाही सोयरंसुतक नसल्याची खंत डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केली.

बीड जिल्ह्यातील ६१ महसुली मंडळात १ आणि २ सप्टेंबर रोजी अतिवृष्टीमुळे सोयाबीन पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी पंचनाम्याचे आदेश देताना सरसकट आर्थिक मदतीचे आश्वासन दिले होते. मात्र दुसरीकडे कृषी विभागाने नुकसानीचा प्राथमिक अहवाल जाहीर करताना बीड जिल्ह्यातील केवळ परळी आणि माजलगाव या दोनच तालुक्यात ३३ टक्केहुन आधिक नुकसान झाल्याचे म्हटले आहे.३५ महसूल मंडळात १०० पेक्षा जास्त मी मी पेक्षा जास्त पाऊस झाला होता.जिल्ह्यातील ६६८ गावातील २ लाख हेक्टर आधिक क्षेत्र बाधित झाले आहे.एनडीआरएफ निकषाप्रमाणे ३३ टक्क्यांहून अधिक नुकसान असेल तरच शेतकरी शासनाच्या मदतीसाठी पात्र ठरतो त्यामुळे कृषी विभागाच्या या अहवालामुळे शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळण्यास अडचणी निर्माण होतील.त्याच बरोबर मुख्यमंत्री महोदयांनी परळी येथील राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन महोत्सवात जाचक ई पिक पाहणी अट रद्द करण्याची घोषणा केली होती परंतु त्याचा शासन आदेश निघाला नाही. त्यामुळे २३ सप्टेंबर जरी ई पिक पाहणीसाठी मुदत वाढवली असली तरी निम्याहुन अधिक शेतकरी शासनाच्या योजनेच्या लाभापासून वंचित राहणार आहेत. शासनाच्या धोरणाच्या निषेधार्थ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शासनाचे पितर जेऊ घालुन शासनाने लक्ष वेधण्यासाठी लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येणार आहे.

# कंधार तालुक्यातील शेतकऱ्यांची झोळी फाटकीच



**सोयाबीनला अतिवृष्टी,**

**यलो मोझॅक रोगाचा फटका**

**उत्पादनात होणार लक्षणीय घट**

**शेतकऱ्यांची मजुरांकडूनही अडवणूक**

### कपाशीची वाढ खुंटली

**कंधार तालुक्यात कपाशीचे लागवडीचे क्षेत्र २७६३६ हजार हेक्टर एवढी आहे.अतिवृष्टीमुळे शेतात पाणी साचल्याने कपाशीच्या पिकांची वाढ झाली नाही.त्यातच कपाशीवरही रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने कपाशीच्या उत्पादनामध्येही घट होणार असून शेतकऱ्यांनी कपाशी लागवडीवर केलेला खर्चही निघणे अवघड होणार आहे.**

### पीक नुकसान भरपाई कधी मिळणार

**कंधार तालुक्यात सप्टेंबर महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात अतिवृष्टी झाल्यामुळे खरीप हंगामातील पिकांतील पिकांसह शेत जमिनीचे नुकसान झाले होते. सप्टेंबर महिन्याचा तिसरा आठवडा संपत आला तरीही सरकारकडून पीक नुकसान भरपाईची रक्कम जाहीर करण्यात आली नाही. शेतकऱ्यांना आता पीक नुकसान भरपाई मिळण्याची प्रतीक्षा लागली आहे.**

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

यंदाच्या खरीप हंगामात सोयाबीनच्या पिकांचे अतिवृष्टीमुळे अतोनात नुकसान झाले असून त्यातच पिकांवर येलो मॅझिक रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने सोयाबीनचे दाणे बारीक झाले आहेत. जे काही शेतामध्ये उभे राहिलेले सोयाबीनचे पीक काढणीसाठी १० ते १५ दिवसांमध्ये येणार असल्यामुळे मजुरांनी १ बॅग सोयाबीन कापणीचा दर वाढविला असून शेतकऱ्यांना १ बॅग काढणीसाठी ४ हजार रुपये मोजावे लगत असून त्यातच सोयाबीनला बाजारपेठेत भाव नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या पदरात सोयाबीनचा खर्च करता काहीच पडणार नसल्यामुळे यंदाही शेतकऱ्यांची झोळी फाटकीच राहणार आहे,

कंधार तालुक्यात यंदा खरीप हंगामामध्ये वेळेवर पाऊस पडल्याने शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर सोयाबीनची पेरणी केली होती. सोयाबीन पिकाला लागेल तसा पाऊस पडत राहिल्याने पिकही चांगले आल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते. परंतु, निसर्गाला शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरील समाधान पहावले नाही,सप्टेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात तालुक्यांत अतिवृष्टी झाल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेले सोयाबीनचे पीक पुराच्या पाण्याने प्रचंड नुकसान केले. त्यातच जे काही शेतात उभे असलेले सोयाबीनचे पीक पाण्यात राहिल्याने पिकांवर पिवळा मॅझिक रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने सोयाबीन पिकाला फटका बसला. दुसरीकडे बाजारपेठेत सोयाबीनचे भाव म्हणावे तसे वाढत नसल्यामुळे शेतकरी चिंतातूर झाले आहेत. शेतकऱ्यांनी एकरी सोयाबीन पिकांवर जवळपास २२ हजार ते २५ हजार रुपये खर्च केला, असून उत्पन्न मात्र एकरी २० ते २५ हजार रुपयेही होते की नाही असा याच विवेचणेमध्ये शेतकरी दिसून येत आहेत. त्यातच रब्बी हंगामाची पेरणी, दिवाळी सण, मुलांचे शिक्षण, कुटूंबाचे पालणपोषण कसे करायचा असा प्रश्नही शेतकऱ्यांसमोर पडला आहे.

# शारदीय नवरात्र महोत्सवानिमित्त श्री क्षेत्र मोहटादेवी गडावर नवरात्र उत्सवाची तयारी सुरू

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहमदनगर । प्रतिनिधी**

शारदीय नवरात्र महोत्सवानिमित्त श्री क्षेत्र मोहटादेवी गडावर नवरात्र उत्सवाची तयारी सुरू झाली आहे. ३ ते १६ ऑक्टोंबर दरम्यान घटस्थापना ते कोजागिरी पौर्णिमा या कालावधीत शारदीय नवरात्र उत्सव संपन्न होत आहे.सर्व धार्मिक कार्यक्रम व विधि साजरा केला जाणार आहे. मोहटा देवीच्या दर्शनासाठी राज्याचा विविध भागातून लाखो देवी भक्त नवरात्र काळात दर्शनासाठी येतात. या भाविक भक्तांच्या सोयी सुविधासाठी मोहटा देवस्थान समितीने प्राथमिक गरजा पुरवण्यासाठी कामकाजाला सुरुवात केली आहे. गर्भगिरीच्या डोंगररांगेत मोहटा देवीचे स्वयंभू स्थान स्थापित आहे.या उंच डोंगरावर देवस्थान समितीने भव्यदिव मंदिराची उभारणी केली आहे. या मंदिर परिसरात सुरुवाती पासून चांगला पाऊस झाल्याने डोंगररांग हिरवागार झाला असून देवीचे मंदिर व आसपासचा परिसर हिरवाईने नटला आहे. गडावर येणाऱ्या प्रत्येक भाविकांना अडचण येणार नाही यासाठी सुलभ दर्शन बारी, पाणी, शौचालय, पार्किंग, निवारा, महाप्रसाद याची कामे देवस्थान समितीकडून युद्ध पातळीवर सुरू असून देख भाल दुरुस्तीचे काम हि सुरू आहे.वन विभागाकडून मोहटा देवस्थानला मंदिर परिसराची मोठी जागा हस्तांतरित झाल्याने मंदिर परिसरातील रस्त्यांचे मोठ्या प्रमाणात रुंदीकरण करण्यात आले आहे. मोहटा देवी गडावर सुमारे दोन हजार दुचाकी मोटरसायकल एकाच वेळी पार्किंग करता येणार आहे. त्यामुळे भाविकांना पायी जाण्यासाठीचे मोठे अंतर कमी होऊन कमी श्रमात देवीचे दर्शन घेता येणार आहे. सध्या मंदिर परिसरातील हनुमान मंदिरापासून पायऱ्यांचे काम, पार्किंग साठी जागा, रस्ते रुंदीकरण करून रस्ते



मोठे करण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे.त्यामुळे मोहटादेवी डोंगरावरील रस्त्यांची वाहतूक कोंडी व भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणावर कमी होऊन देवी भक्तांना सुलभ दर्शन घेता येणार आहे. मोहटा देवीला येण्यासाठी सर्व मुख्य रस्ते खड्डे मुक्त असल्याने भाविकांचा प्रवास सुखकर होणार आहे. रंगरंगोटी, दर्शन बारीतील रेलिंग दुरुस्ती, मंडप उभारणीचे कामे जोरात सुरू आहे. गुरुवारी ३ ऑक्टोबर रोजी मोहटादेवी गडावर सकाळी देवस्थान समितीचे अध्यक्ष यांच्या हस्ते घटस्थापना केली जाणार आहे.शुक्रवार दि. ११ ऑक्टोबर स. ०८:०० ते दू. १२:३० वा. होमहवन व पूर्णाहुती जिल्हा प्रमूख न्यायाधीश यांच्या प्रमुख उपस्थिती होणार आहे. शनिवारी १२ ऑक्टोबर रोजी कावडीचे पाणी व काल्याचे कीर्तन, रविवार १३ ऑक्टोबर रोजी श्री मोहटादेवी यात्रा, पालखी सोहळा, छबिना मिरवणुक, सोमवार १४ ऑक्टोबरला हजेऱ्या व हंगामा, बुधवारी १६ ऑक्टोबर कोजागरी पौर्णिमेला नवरात्राची सांगता होणार आहे. शारदीय नवरात्र महोत्सव कालावधीमध्ये भजन, कीर्तन, प्रवचन आदी धार्मिक कार्यक्रम संपन्न होत आहेत.भाविक भक्तांनी देवी दर्शनाचा लाभ घ्यावा.असे आवाहन श्री मोहटादेवी देवस्थान कडून करण्यात आले आहे.राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावरील तनपुरवाडी फाटा ते आयटीआय कॉलेज बीड पाथर्डी या राज्य मार्ग दरम्यानच्या सुमारे दीड किलोमीटर हून अधिक रस्त्याची दुरावस्था अनेक वर्षापासून आहे. अनेक बैठका शासकीय अधिकाऱ्यांच्या या रस्त्याबाबत झाल्या रस्ता करावा अशी मागणी झाली. मात्र हा रस्ता कोणत्या विभागाचा आहे. हेच कळायला मार्ग नाही. रस्त्याचे रेकॉर्ड उपलब्ध नसल्यामुळे रस्ता करावा कोणी असा प्रश्न पडलेला आहे. त्यामुळे वर्षानुवर्ष देवीच्या भाविक भक्तांसह येथून प्रवास करणाऱ्या लोकांना रस्त्याच्या दुरावस्थेत सामना करावा लागत आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904